डाक नोंद पोच देय

# उद्योग संचालनालय

भांडार खरेदी संघटना,

नविन प्रशासन भवन,मंत्रालयासमोर, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०० ०३२.

दुरध्वनी क्रमांक-०२२ २२०२३५०५. वेबसाईट क्र.www cspo@maharashtra gov. in

क्र.उसं/मभांखसं/पुरवठादार/तक्रार/सर्व विभागाकडुन बंदी/२०१७/सी-६६०० दिनांक: 23 AUG 2017

## बंदी आदेश

**वाचा:**१) अप्पर पोलिस महासंचालक व कारागृह महानिरिक्षक कार्यालय, महाराष्ट्र राज्य,पुणे यांचे पत्र जा.क्र.कारखाना/कोमका/ठामका/निविदा/गैरव्यवहार/कक्ष १०/१२४६८/पुणे-१,दि.५.११.२०१५

२) अप्पर पोलिस महासंचालक व कारागृह महानिरिक्षक कार्यालय, महाराष्ट्र राज्य,पुणे यांनी घटकावर कारागृह विभागाअंतर्गत घातलेल्या बंदी आदेशाचे पत्र जा.क्र.कारखाना/कोमका/ठामका/निविदा/गैरव्यवहार/कक्ष १०/१२४७०/पुणे-१०,दि.५.११.२०१५

३) उद्योग संचालनालयाचे घटकाकडून खुलासा मागविलेबाबतचे पात्र क्र.उसं/मभांखस/पुरवठा/तक्रार/२०१५/सी-८८४,दि.१/०२/२०१६.

४) जिल्हा उद्योग केंद्र, नाशिक यांचा अहवालाबाबतचे पत्रक्र.जिऊकेंना/सीएसपीओ/३२९,दि.२१/३/२०१६.

५) मे.सिंध रेक्झीन हाऊस यांचा खुलासाबाबतचे पत्र दि.२९/०३/२०१६.

६) उद्योग संचालनलयाचे मध्यवर्ती भांडार खरेदी यादीतून वगळणे बाबतचे पत्र क्र.जिऊकेंना/सीएसपीओ/२०१६/१६३९,दि.२१/३/२०१६.

७) उद्योग,उर्जा व कामगार विभागाने सर्व विभागाची बंदी घालणेबाबतचे आदेशास दिलेली मान्यता पत्र क्र.भांखस-२०१७/प्र.क्र.४५/उद्योग-४,दि.०३/०६/२०१७.

**प्रस्तावना**

उपरोक्त संदर्भ (१) अन्वये, अप्पर पोलीस महासंचालक व कारागृह महानिरीक्षक यांनी मे.सिंध रेक्झिन हाऊस ,नाशिक, या घटकाने अधिक्षक, मध्यवर्ती कारागृह कोल्हापूर व ठाणे यांचे निविदा मध्ये बनावट कागदपत्रांच्या सहाय्याने सहभाग नोंदवून शासनाची फसवणूक केल्याने त्यांचे व त्यांच्या सलग्न संस्था मे.सिंध ट्रेडिंग कार्पोरेशन, मे.उमंग फर्निशिंग, नाशिक, या संस्थांची नावे मध्यवर्ती भांडार खरेदी संघटनेच्या मान्यता प्राप्त पुरवठादार यादीतून काढून टाकणे व सर्व विभागाकडून बंदी घालणेसाठी या कार्यालयास कळविले आहे.

१. अधिक्षक, कोल्हापूर मध्यवर्ती कारागृह यांनी सन २०१४-१५ या आर्थिक वर्षाकरिता ६ एस.जी.सी. सुत खरेदी करणेकरिता निविदा प्रक्रिया राबविली होती. सदर निविदे प्रक्रियेत मे.सिंध रेक्झिण हाऊस, नाशिक या संस्थेने सहभाग नोंदविला होता. निविदा प्रक्रियेदरम्यान मे. सिंध रेक्झिण हाऊस, नाशिक यांनी जी कागदपत्रे सादर केली त्यामध्ये बयाणा रक्कमेतून सूट मिळविणेकरिता मध्यवर्ती भांडार खरेदी पत्र मान्यताप्राप्त पुरवठादार म्हणुन नोंदणीकृत असल्याचे प्रमाणपत्र तसेच ६ एस.जी.सी. सुताचा पुरवठा करणेकरीता श्री पदमावती कॉटस्पीन, मालेगाव, नाशिक यांचे प्राधिकारपत्र (ऑथोरायझेशन) यांचा समावेश होता.

निविदा प्रकियेमध्ये मे. सिंध रेक्झिण हाऊस, नाशिक यांचे दर प्रति किलो न्युनतम असल्याने त्यांना नियमानुसार निविदा स्विकृती पत्र (ए.टी.) देण्यात आली. अधीक्षक, कोल्हापूर मध्यवर्ती कारागृह यांनी दिलेल्या स्विकृती पत्र (ए.एल.)मधील कलम १ मध्ये तसेच निविदा स्विकृती (ए.टी.) मधील शेडयुल अे कलम ३ मध्ये, 'श्री पदमावती कॉटस्पीन, मालेगाव, नाशिक यांनी उत्पादित केलेले ६ एस.जी.सी. सुताचा पुरवठा करावा.' असे स्पष्टपणे नमुद करण्यात आले आहे. दिनांक ५.३.२०१५ रोजी मे.सिंध रेक्झिण हाऊस, नाशिक यांनी ६ एस.जी.सी. सुताचा पुरवठा कोल्हापूर मध्यवर्ती कारागृह येथे केला. त्यावेळी पुरवठयासोबत जी कागदपत्रे सादर केली त्यामध्ये अ) पुरवठयाचे देयक, ब) श्री पदमावती कॅाटस्पीन, मालेगाव, नाशिक यांचे डिलीव्हरी चलन तसेच क) श्री पदमावती कॉटस्पीन, मालेगाव, नाशिक यांनी सदर लॉटचे सूत उत्पादित केल्याचे पत्र इ.चा समावेश होता. त्या अनुषंगाने प्राप्त मालाचे निरीक्षण केले असता सुतांच्या बॅगांवर श्री. पदमावती कॉटस्पीन, मालेगाव, नाशिक यांचे ऐवजी मे.गंगोत्री, कुंभोजगिरी रोड, आळतेगांव, ता. हातकंलगणे, जिल्हा कोल्हापूर या संस्थेचे लेबल आढळून आल्याने सदर प्रकरणी संशय निमार्ण झाला.

त्याबाबत शहानिशा करणेकरीता श्री.पदमावती कॉटस्पनी, मालेगाव, नाशिक यांचेकडे कोल्हापूर मध्यवर्ती कारगृहाच्या प्रतिनिधीने प्रत्यक्ष भेटून संपर्क साधला व श्री पदमावती कॉटस्पीन, मालेगाव, नाशिक यांनी मे. सिंध रेक्झिण हाऊस, नाशिक यांचे मार्फत अधिक्षक, कोल्हापूर मध्यवर्ती कारागृह यांना ६ एस.जी.सी. सुताचा पुरवठा केला किवा कसे? याबाबत लेखी अभिप्राय प्राप्त करुन घेतला.

श्री पदमावती कॉटस्पीन, मालेगाव, नाशिक यांचेकडून प्राप्त लेखी अहवालानुसार मे.सिंध रेक्झिण हाऊस,नाशिक यांना श्री पदमावती कॉटस्पीन, मालेगाव,नाशिक यांनी कोणतेही प्राधिकार पत्र दिलेले नाही व सुताचा पुरवठा केला नाही. तसेच मे.सिंध रेक्झिण हाऊस, नाशिक यांनी श्री पदमावती कॉटस्पीन, मालेगाव,नाशिक यांची सादर केलेली कागदपत्रे बनावट असुन त्यावरील स्वाक्षरी देखिल बनावट असल्याचेही त्यांच्या अहवालात नमुद केले आहे. याबाबत अधिक्षक, कोल्हापूर मध्यवर्ती कारागृह यांनी मे. सिंध रेक्झिण हाऊस,नाशिक यांचेकडून खुलासा मागविलेला होता. परंतु प्राप्त खुलासा असमाधानकारक आहे.

२) अधिक्षक, ठाणे मध्यवर्ती कारागृह यांनी सन २०१४-१५ या वर्षामध्ये प्लायवूड खरेदीसाठी राबविलेल्या निविदा प्रक्रियेतही मे.सिंध रेक्झिन हाऊस, नाशिक या संस्थेने सहभाग नोंदविताना जी कागदपत्रे सादर केली त्यामध्ये बयाना रक्कमेमधून सुट मिळविण्याकरिता मध्यवर्ती भांडार खरेदी संघटनेचे मान्यता प्राप्त पुरवठादार म्हणून नोंदणीकृत असल्याचे प्रमाणपत्र तसेच मे.निशांत वुड क्राफट, पुणिर्या सिटी, बिहार यांचे प्राधिकारपत्र सादर केले होते. सदर निविदा प्रक्रियेमध्ये आपले दर न्युनतम असल्याने निविदा स्विकृती पत्र (ए.टी.) सादर केले होते. निविदा प्रक्रियेतील मे.सिंध रेक्झिन हाऊस, नाशिक यांचे दर न्युनतम (L.१) असल्याने स्विकृती पत्र व निविदा स्विकृती देण्यात आली, तसेच निविदा स्विकृती (ए.टी.) मधील शेडयूल ए कलम ३ मध्ये मे.निशांत वुड क्राफट, पुणिर्या सिटी, बिहार यांनी उत्पादित केलेल्या प्लायवुडचा पुरवठा करावा असे स्पष्ट नमुद केले होते. निविदा स्विकृती (A.T.) प्राप्त झाल्यानंतर मे. सिंध रेक्झिन हाऊस, नाशिक यांनी ठाणे मध्यवर्ती कारागृह येथे प्लायवुडचा पुरवठा केला परंतु त्या प्लायवुडवर निर्मीती/पुरवठा करणा-या संस्थेच्या नावाचा उल्लेख नाही. प्लायवुडचा दर्जा अत्यंत निकृष्ट असुन त्याची गुणवत्ता (जाडी) मानकापेक्षा कमी आहे. त्यामुळे पुरवठा करण्यात आलेल्या प्लायवूडची पाहणी करावी व प्लायवुड बदलून द्यावे याबाबत अधिक्षक, ठाणे मध्यवर्ती कारागृह यांनी वारंवार पत्रव्यवहार करुनही मे. सिंध रेक्झिण हाऊस, नाशिक यांनी कोणताही प्रतिसाद दिला नाही.याबाबत संशय निर्माण झाल्याने अधीक्षक, ठाणे मध्यवर्ती कारागृह यांनी मे. निशांत वुड क्राफट, पुर्णिया सिटी, बिहार या

संस्थेकडे विचारणा केली असता त्यांनी सिंध रेक्झिन हाऊस, नाशिक हे त्यांचे अधिकृत वितरक नसल्याचे, तसेच मे. सिंध रेक्झिण हाऊस, नाशिक यांना कधीही प्लायवुड पुरवठा न केल्याबाबत कळविले आहे.

प्रस्तुत प्रकरणांच्या अनुषंगाने मे.सिंध रेक्झिन हाऊस, नाशिक यांनी कोल्हापूर मध्यवर्ती कारागृह व ठाणे मध्यवर्ती कारागृह यांचे निविदा मध्ये जाणुन-बुजुन खोटी कागदपत्रे सादर करुन नियमांची पायमल्ली करुन शासनाची गंभीर फसवणूक केली. उद्योग, उर्जा व कामगार विभागाचा शासन निर्णय व खरेदीची नियमपुस्तिका दि.३०.१०.२०१५ मधील पान क्रमांक ६८ मुद्या क्रमांक ५.३ (अ) 'एका विभागाकडून बंदी घालणे' अन्वये संदर्भ क्र.(२) नुसार कार्यवाही करत महाराष्ट्र कारागृह विभागास पुरवठा करण्यास प्रतिबंधीत (Banning) ची कारवाई करण्यात आली आहे. या संस्थांवर कारागृह विभागा अंतर्गत २० वर्षाकरिता बंदी घालण्यात आली आहे.

मे.सिंध रेक्झिण हाऊस, नाशिक चे संचालक श्री.मोती दयालानी व त्यांचेशी संबधीत संस्था मे.सिंध ट्रेडिंग कार्पोरेशन व मे.उमंग फर्निसिंग या संस्थाचे संचालक दयालानी बंधू हे संयुक्तरित्या करित असल्याचे कारागृह विभागाकडून अभिलेख्यांवरुन निष्पन्न झाले असल्याचे कारागृह विभागाने कळविले आहे. वरील तीनही संस्था चालक वेगवेगळे असले तरी ते सयुक्तरित्या व्यवहार करतात. त्यामुळे केवळ एका संस्थेवर प्रतिबंध घातल्याने शासनाचा हेतू साध्य होणार नाही व दयालानी बंधु इतर दोन संस्थांच्या नावाचा अयोग्य पध्दतीने वापर करुन शासनाची फसवणूक करु शकतात. अप्पर पोलीस महासंचालक व कारागृह महानिरीक्षक यांनी मे. सिंध रेक्झिण हाऊस, नाशिक, या घटकाने मध्यवर्ती कारागृह कोल्हापूर व ठाणे यांचे निविदा मध्ये बनावट कागदपत्रांच्या सहाय्याने सहभाग नोंदवून शासनाची फसवणूक केल्याने त्यांचे व त्यांच्या सलग्न संस्था मे.सिंध ट्रेडिंग कार्पोरेशन, मे.उमंग फर्निशिंग,नाशिक, या संस्थांची नावे मध्यवर्ती भांडार खरेदी संघटनेच्या मान्यता प्राप्त पुरवठादार यादीतून काढून टाकणे व सर्व विभागाकडून बंदी घालणेसाठी संचालनालयास शिफारस केली आहे.

**आदेश**

१. ज्याअर्थी, मे.सिंध रेक्झीन हाऊस, नाशिक व त्याच्या सहयोगी कंपन्यांची उद्योग,उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय दि.०१/१२/२०१६ मधील परिच्छेद ५.२ (आ) अन्वये उद्योग संचालनालयाकडून सुनावणी घेऊन चौकशी करण्यात आली.

२. ज्याअर्थी, मे. सिंध रेक्झीन हाऊस, नाशिक व त्यांच्या सहयोगी कंपनीच्या निविदाकारांची खरेदी नियम पुस्तिका (पर्चेस म्यॅन्युअल) मधील खंड ५ च्य क्लॉज १२(अे) (१) अन्वये केलेल्या चौकशीमध्ये कंपनीवर लावण्यात आलेले दोषारोप संपूर्णत: सिध्द होत आहेत. व कंपनीस सिध्द अपराधी ठरविण्यात आलेले आहे.

३. ज्याअर्थी, मे. सिंध रेक्झीन हाऊस, नाशिक या कंपनीला दि.०१/०२/२०१६ रोजी बजावण्यात आलेल्या कारणे दाखवा नोटीसीला मे. सिंध रेक्झीन हाऊस, नाशिक यांचेकडून दि.२९/०३/२०१६ रोजी खुलासा सादर करण्यात आलेला आहे. आणि

४. ज्याअर्थी, मे. सिंध रेक्झीन हाऊस, नाशिक या कंपनीने सन २०१४-१५ या आर्थिक वर्षामध्ये अधिक्षक, मध्यवर्ती कारागृह, कोल्हापूर व अधिक्षक, मध्यवर्ती कारागृह ठाणे या कार्यालयांनी राबविलेल्या निविदा प्रक्रियेमध्ये बनावट कागदपत्रांच्य आधारे सहभागी होऊन शासनाची फसवणूक केली असल्याने ते सकृतदर्शनी दोषी असल्याचे निदर्शनास आलेले आहे. आणि

५. ज्याअर्थी, उद्योग उप संचालक, उद्योग संचालनालय, मुंबई यांच्या दि.०४/०६/२०१६ च्या अहवालान्वये शासन निर्णय दि.०१/१२/२०१६ मधील प्रकरण क्रमांक ०५ मधील परिच्छेद क्र.५.३ मधील तरतूदीनुसार या तीनही घटकांस मध्यवर्ती भांडार खरेदी संघटनेच्या मान्यताप्राप्त पुरवठादारांच्या यादीतून

काढून टाकण्याची शिफारस केलेली आहे. तसेच या शासन निर्णयातील परिच्छेद क्र. ५.२ (आ) मधील तरतुदीनुसार सर्व विभागांकडून बंदी घालण्याबाबत शिफारस करण्यात आलेली आहे.

६. त्याअर्थी, मे.सिंध रेक्झीन हाऊस, नाशिक या घटकांस व त्याच्या सहयोगी संस्था मे. सिंध ट्रेडिंग कॉर्पोरेशन, नाशिक व मे. उमंग फर्निशिग, नाशिक या घटकांना उद्योग,उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय दि.०१/१२/२०१६ मधील प्रकरण क्रमांक ०५ मधील परिच्छेद क्रमांक ५.३ मधील तरतूदीनुसार मध्यवर्ती भांडार खरेदी संघटनेच्या मान्यता प्राप्त पुरवठादार यादीतून काढून टाकण्यात येत आहे. तसेच याच शासन निर्णयातील परिच्छेद क्रमांक ५.३(आ) मधील तरतुदीनुसार सर्व विभागांकडून या आदेशाच्या दिनांकापासून तीन वर्षाच्या कालावधीकरिता बंदी घालण्याचे आदेश देण्यात येत आहेत. सदर कालावधी मध्ये नियमपुस्तीकेतील परिच्छेद २.४ मधील लक्षांकित विभाग/कार्यालयांनी सदर संस्थांकडून खरेदी करण्यात येऊ नये. तसेच सदरचा बंदी आदेश महाराष्ट्र शासनाचे www. Maharashtra·gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

**विकास आयुक्त (उद्योग)**
**उद्योग संचालनालय,मुंबई**

प्रत:-१) शासनाचे सर्व अप्पर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव(सर्व)-------------------------------- यांनी त्यांचे अधिनत्त्याखालील सर्व कार्यालये/मंडळ/महामंडळ यांना निदर्शनास आणण्याच्या अनुषंगाने कार्यवाही करावी.

२) अप्पर पोलिस महासंचालक व कारागृह महानिरिक्षक कार्यालय, महाराष्ट्र राज्य,जुनी प्रशासकीय इमारत, २. दुसरा मजला, पुणे- ४०० ००१.

३) मे.सिंध रेक्झिन हाऊस, नाशिक शॉप क्र.२, मिरजकर कॉम्प्लेक्स्,बेला पेट्रोल पंपाजवळ, द्वारका पॉईंट, नाशिक ४२२ ००१.

४) मे.सिंध ट्रेडिंग कार्पोरेशन, नाशिक शॉप क्र.२, मिरजकर कॉम्प्लेक्स्,बेला पेट्रोल पंपाजवळ, द्वारका पॉईंट, नाशिक ४२२ ००१.

५) मे.उमंग फर्निशिंग, नाशिक शॉप क्र.२, मिरजकर कॉम्प्लेक्स्,बेला पेट्रोल पंपाजवळ, द्वारका पॉईंट, नाशिक ४२२ ००१.

६) निवडनस्ती, भांडार खरेदी शाखा, उद्योग संचालनालय, नविन प्रशासन भवन,मंत्रालयासमोर, मुंबई-३२.